।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Phone: (02462) 229294** **EXAMINATION DEPARTMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 229572** **e-mail:directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. : परीक्षा/२०१९-२०/२० दिनांक: १९/०५/२०२०

परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

मा. संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ

मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर

मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, परभणी,

मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली

मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : उन्हाळी २०२० परीक्षा कार्यपध्दती बाबत.

संदर्भ : ०१. शासनपत्र क्रमांक संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१२३/विशि-३ दिनांक ०८ मे, २०२०

०२. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र. युएनआ/२०२०/बैठक विशि-१/४१३१ ए दि. ०८ मे, २०२०.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२० पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या माहे मार्च/एप्रिल/मे २०२० मध्ये घेण्यात येणार होत्या परंतु कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी जाहीर केली असल्यामुळे उक्त परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या होत्या. मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत केली होती. सदर समितीने राज्यातील विद्यापीठीय परीक्षांचे आयोजन करण्याबाबत केलेल्या शिफारशी राज्य शासनाने स्विकृत केल्या आहेत व या शिफारशीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता राज्यातील विद्यापीठांना कळविण्यात आले आहे.

सबब, या अहवालातील शिफारशीनुसार व परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दिनांक १२/०५/२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड परीक्षेत्रातील सर्व शैक्षणिक संकुल, विद्यापीठ उपपरीसर, लातूर, विद्यापीठ उपपरीसर परभणी, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, स्वायत्त महाविद्यालये व संलग्नीत महाविद्यालयातील उन्हाळी-२०२० परीक्षेसाठी परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा व निकालासंबधी खालीलप्रमाणे कळविण्यात येते.

**०१. परीक्षा आवेदन पत्र सादर करणे बाबत.**

ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी-२०२० परीक्षेसाठी परीक्षा आवेदन पत्र भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवदेनपत्र दिनांक ०१ जुन, २०२० ते २० जून, २०२० पर्यंत महाविद्यालयात नियमित शुल्कासह स्वीकारावेत. या सर्व आवेदनपत्राचे परीक्षा शुल्क २३ जून, २०२० पर्यंत संबंधीत महाविद्यालयाने विद्यापीठाच्या बॅक खात्यामध्ये NEFT द्वारे भरावेत. दिनांक २५ जून, २०२० पर्यंत सर्व परीक्षा आवेदनपत्रे व बॅकेत NEFT द्वारे परीक्षा शुल्क भरल्याचा पुरावा यासह खालील ठिकाणी सादर करावेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचेनांव | आवेदनपत्र सादर करावयाचे ठिकाण |
|---|---|---|
| ०१ | नांदेड | परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. |
| ०२ | परभणी | विद्यापीठ उपपरिसर, परभणी |
| ०३ | लातूर | विद्यापीठ उपपरिसर, लातूर |
| ०४ | हिंगोली | न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली. |

जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करुन प्रचलित अभ्यासक्रमानुसार परीक्षा देणे बंधनकारक आहे.

**०२. उन्हाळी २०२० परीक्षेकरीता मूल्यमापनाची/गुणदानाची कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे :**

i. केवळ पदवी व पदव्युत्तर अंतीम सत्राची परीक्षा विद्यापीठामार्फत घेण्यात येईल.

ii. दोन वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये चौथ्या सत्राची परीक्षा विद्यापीठाच्यावतीने संपन्न होईल. या स्थितीत चौथ्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र १, २ व ३ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा विद्यार्थ्यांची १,२ व ३ सत्राची परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या पातळीवर महाविद्यालयाने दिनांक ०८/०७/२०२० पर्यंत घेवुन दिनांक १०/०७/२०२० पुर्वी गुणयाद्या परीक्षा विभागामध्ये सादर करण्यात याव्यात.

iii. तीन वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये सहाव्या सत्राची परीक्षा विद्यापीठाच्यावतीने संपन्न होईल. या स्थितीत सहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ३, ४ व ५ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा विद्यार्थ्यांची ३,४ व ५ सत्राची परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या पातळीवर महाविद्यालयाने दिनांक ०८/०७/२०२० पर्यंत घेवुन दिनांक १०/०७/२०२० पुर्वी गुणयाद्या परीक्षा विभागामध्ये सादर करण्यात याव्यात.

iv. चार वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये आठव्या सत्राची परीक्षा विद्यापीठाच्यावतीने संपन्न होईल. या स्थितीत आठव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ५, ६ व ७ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा विद्यार्थ्यांची ५, ६ व ७ सत्राची परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या पातळीवर महाविद्यालयाने दिनांक ०८/०७/२०२० पर्यंत घेवुन दिनांक १०/०७/२०२० पुर्वी गुणयाद्या परीक्षा विभागामध्ये सादर करण्यात याव्यात.

v. पाच वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये दहाव्या सत्राची परीक्षा विद्यापीठाच्यावतीने संपन्न होईल. या स्थितीत दहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ७, ८ व ९ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा विद्यार्थ्यांची ७, ८ व ९ सत्राची परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या पातळीवर महाविद्यालयाने दिनांक ०८/०७/२०२० पर्यंत घेवुन दिनांक १०/०७/२०२० पुर्वी गुणयाद्या परीक्षा विभागामध्ये सादर करण्यात याव्यात.

vi. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अंतीम सत्रासाठी पात्र असणा-या विद्यार्थ्यांच्या अनुशेष (बॅकलॉग) वगळता उर्वरीत विद्यार्थ्यांच्या अनुशेष (बॅकलॉग) विषयांची/पेपरची परीक्षा हिवाळी २०२० मध्ये घेण्यात येतील. संबंधीत विद्यार्थ्यांनी उन्हाळी - २०२० साठी परीक्षा शुल्कासह आवेदनपत्र भरले असल्यामुळे त्यांनाच हिवाळी - २०२० परीक्षेसाठी वेगळे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क भरावे लागणार नाही. या स्थितीत अनुशेष (बॅकलॉग) विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेशास (Carry Forward) मान्यता देण्यात येईल परंतु त्यांनी हिवाळी - २०२० मध्ये होणा-या परीक्षेत अनुशेषाचा विषय उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. सदरील

नियम कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या मार्गदर्शक निर्देशामुळे फक्त याच शैक्षणिक वर्षा पुरताच लागू राहील.

vii. एक वर्षीय अभ्यासक्रमाच्या अंतीम लेखी परीक्षा विद्यापीठामार्फत होईल.

viii. दुरशिक्षण अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याकरीता याच पध्दतीने परीक्षा व गुणदान देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्राचे विद्यार्थी वगळून ज्यांना लगतच्या सत्र परीक्षांच्या गुणांवर आधारीत गुणांकन केले जाणार आहे, असे विद्यार्थी पूढील प्रमाणे असतील.**

| अभ्यासक्रम | परीक्षा न होता निकाल जाहीर होणार असे सत्र |
|---|---|
| दोन वर्षीय अभ्यासक्रमातील विद्यार्थी उदा. एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. इ. | प्रथम वर्ष सत्र - २ |
| तीन वर्षीय अभ्यासक्रम प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी<br>उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.बी.ए., बी.सी.ए. इ. | प्रथम वर्ष सत्र - २<br>द्वितीय वर्ष सत्र - ४ |
| चार वर्षीय अभ्यासक्रमातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी<br>उदा. बी.ई., बी.टेक. इ. | प्रथम वर्ष सत्र - २<br>द्वितीय वर्ष सत्र - ४<br>तृतीय वर्ष सत्र - ६ |
| पाच वर्षीय अभ्यासक्रमातील प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी<br>उदा. बी.एस.एल. इ. | प्रथम वर्ष सत्र - २<br>द्वितीय वर्ष सत्र - ४<br>तृतीय वर्ष सत्र - ६<br>चतुर्थ वर्ष सत्र - ८ |

वरील तक्त्यामध्ये नमूद विद्यार्थ्यांचे गुणदान पाठवित असताना दुस-या सत्रासाठी लगतची परीक्षा म्हणजे प्रथम सत्र, चौथ्या सत्रासाठी तिसरे सत्र, चार वर्षिय अभ्यासक्रमाच्या सहाव्या सत्रासाठी पाचवे सत्र व पाच वर्षिय अभ्यासक्रमाच्या आठव्या सत्रासाठी लगतचे सत्र म्हणजे सातवे सत्र गृहीत धरावे.

गुणांकन करीत असताना ज्या सत्राचे गुणांकन केले जात आहे त्या सत्राच्या अंतर्गत गुणांचे ५०% गृहीत धरावे तसेच लेखी रुपांतरासाठी लगतच्या सत्राच्या एकूण गुणांच्या ५०% गुण घ्यावेत. यासाठी खाली दिलेल्या सुत्रांचा अवलंब करावा.

$$\text{अंतर्गत रुपांतर (५०\%)} = \frac{\text{चालू सत्रातील विषयांचे प्राप्त अंतर्गत गुण} \times \text{५०}}{\text{त्याच विषयांचे अंतर्गत कमाल गुण}}$$

$$\text{लेखी रुपांतर (५०\%)} = \frac{\text{लगतच्या मागील सत्रातील एकुण प्राप्त गुण} \times \text{५०}}{\text{लगतच्या मागील सत्राचे एकुण गुण}}$$

वरील प्रमाणे सुत्रामध्ये संख्या घेत असताना उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणपत्रिकेवर एकुण गुण आहेत ते घ्यावे परंतु लगतच्या सत्रामध्ये एक किंवा एकापेक्षा अधिक पेपरमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर एकुण गुणांची बेरीज दर्शविलेली नसल्यामुळे या स्थितीत लगतच्या सत्रात संबंधीत विद्यार्थ्याने जे गुण प्राप्त केले असतील त्या गुणांची बेरीज करुन ते गुण घ्यावेत.

वरीलप्रमाणे सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये, सर्व संकुले यांनी विद्यार्थ्याचे मूल्यमापन करावे. विद्यार्थ्याचे विषयनिहाय मूल्यमापन संबंधीत शिक्षक करतील तसेच प्रत्येक वर्षाच्या सत्राचे सर्व विषयाचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट आऊट महाविद्यालय प्राचार्याच्या/संकुल संचालकांच्या सहीने परीक्षा विभागाकडे दिनांक ३० जुन, २०२० पर्यंत पाठविण्यात यावेत. सदर गुणदान काळजीपूर्वक करावे. महाविद्यालयाने वरीलप्रमाणे गुण परीक्षा विभागाकडे पाठविल्यानंतर त्या गुणयाद्यांचे प्रमाणिकरण परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शिफारस केलेल्या समितीमार्फत करण्यात येणार आहे . यामध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही याची काळजी महाविद्यालयाने घ्यावी.

विद्यापीठातील सध्याच्या पध्दतीनुसार अंतर्गत गुण हे सर्व अभ्यासक्रमासाठी अंतर्गत गुणांचे ५० टक्केमध्ये रुपांतरीत करण्यात येतील. हे करतांना जर एखाद्या विद्यार्थ्यांचे गुण अपुर्णांकात येत असल्यास त्याचे रुपांतर दशांशाच्या पुढे ५० किंवा अधिक असल्यास पुढील पुर्णांकात व दशांशाच्या पुढे ५० पेक्षा कमी असल्यास मागील पुर्णांकात घ्यावे.

उदा. ५९.४९ किंवा त्यापेक्षा कमी असेल तर ५९ घ्यावे व ५९.५० किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर ६० घ्यावे.

**महाविद्यालयाने खालील तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांचे गुणदान विद्यापीठास सादर करावे.**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | आसन क्रमांक | मूल्यमापन/गुणदान | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चालू सत्राच्या अंतर्गत गुणांचे ५० टक्के | पुर्वीच्या सत्राच्या प्राप्त गुणांचे ५० टक्के | एकुण गुण |
| | | | ‘अ‘ | ‘ब‘ | अ+ब |
| | | | | | |

**०३. इतर सुचना :**

i. सत्रांतर्गत परीक्षा हि कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यमान शैक्षणिक वर्षासाठी (२०१९-२०२०) करण्यात आलेली उपाययोजना आहे, जेणे करुन सर्व भागधारकांच्या सुरक्षेचा आणि आरोग्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही आणि विद्यार्थ्यांसाठी परीक्षांचे पावित्र्य आणि गुणवत्ता सांभाळली जाईल.

ii. वरील प्राप्त गुणदान/निकालामुळे विद्यार्थी समाधानी नसेल तर त्यास पुढील हिवाळी-२०२० परीक्षेमध्ये सुधारणेची (Improvement) संधी देण्यात येईल तसेच वरील गुणदान/निकालामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला असेल तर त्याला पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल व त्यास पुढील हिवाळी-२०२० परीक्षेमध्ये तो विषय उत्तीर्ण करावा लागेल.

०३ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा हया १ जूलै, २०२० ते ३० जूलै, २०२० दरम्यान घेण्यात येतील. यासाठी वेळापत्रक परीक्षा विभागाच्या वतीने १० जुन, २०२० पर्यंत विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

०४ वरील शासननिर्णयानुार शैक्षणिक क्षेत्राचे पावित्र्य व परीक्षा पध्दतीची निष्ठा लक्षात घेऊन पदवी व पदव्युत्तर अंतीम वर्षाच्या अंतीम सत्राची परीक्षा ही प्रचलीत पध्दतीने म्हणजेच लेखी घेण्यात येईल.

०५ पदवी व पदव्युत्तर परीक्षा केंद्राबाबत स्वतंत्र परीपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

०६ पदवी व पदव्युत्तर परीक्षांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेताना छोटया तुकडयात किंवा कमीतकमी वेळेत किंवा पुर्ण दिवसात अनेक तुकडया करुन परीक्षा घ्याव्यात, तर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बोलावून मूल्यमापन करणे शक्य नसेल तर त्यांचे जर्नल्स, अंतर्गत, मौखिक परीक्षा, स्काईप किंवा इतर उपकरणांच्या माध्यमातून घ्याव्यात व त्यांचे मूल्यमापन करावे.

०७ पदवी स्तरावरील राहिलेल्या उन्हाळी २०२० परीक्षांचे प्रात्यक्षिक/एस.ई.सी./प्रकल्प ई. दिनांक १५ जुन, २०२० ते ३० जुन, २०२० दरम्यान आयोजित करुन त्यागुण याद्या ०५ जुलै, २०२० पर्यंत परीक्षा विभागात सादर कराव्यात.

०८ प्रात्यक्षिक/एस.ई.सी./प्रकल्प परीक्षेसाठी अंतर्गत व बाह्य परीक्षक म्हणून त्याच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी परीक्षकाची जबाबदारी पार पाडावी.

०९ प्रात्यक्षिक/एस.ई.सी./प्रकल्प परीक्षा घेताना सामाजिक अंतर व विद्यार्थ्यांचे आरोग्य याबाबत शासन निर्देशित आदेशांची अमलबजावणी करण्यात यावी.

१० पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक/अंतर्गत परीक्षा या दिनांक ०१ जुलै, २०२० ते १० जुलै, २०२० दरम्यान घेण्यात याव्यात. गुणयाद्या दिनांक ११ जुलै, २०२० रोजी परीक्षा विभागात सादर कराव्यात.

११ संलग्नित महाविद्यालये/विद्यापीठ संकुलातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्राच्या लेखी परीक्षा दिनांक ११ जुलै, २०२० ते २० जुलै, २०२० दरम्यान घेण्यात येतील.

१२ एम.फिल. अभ्यासक्रमाची परीक्षा पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबरच दिनांक११ जुलै, २०२० ते २० जुलै, २०२० दरम्यान घेण्यात येतील.

१३ विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात अधिक माहिती व समुपदेशन करण्यासाठी तक्रार निवारण व समुपदेशन कक्षाची विद्यापीठात व जिल्हानिहाय एक समिती स्थापन केली आहे. विद्यार्थ्यांनी या समितीच्या संदस्यांशी संपर्क साधून आपल्या शंकाचे निरसन करावे.

१४ सध्या कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावामुळे विद्यापीठीय परीक्षे संदर्भात शासना कडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशाचे पालन होईल व त्याप्रमाणे बदल होतील.

१५ अशा प्रकारे परीक्षा घेतांना व निकाल लावतांना सर्व विद्यार्थ्यांना समान संधी व परीक्षेचे पावित्र्य व गुणवत्ता राखली जाईल याची काळजी घेण्यात यावी.

१६ विद्यार्थ्यांना शंकांचे निरसन करण्याकरीता खालीलप्रमाणे अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यासमोर दर्शविलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावरुन शंकेचे निरसन करण्यात येईल.

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | अभ्यासक्रम | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री कोंडेकर जी.एम., सहा. अधिक्षक | विज्ञान अभ्यासक्रम | ९८८१३४०७८१ |
| २ | श्री शेख सिकंदर, सहा. अधिक्षक | व्यावसायिक अभ्यासक्रम | ९५१८९३३९९६ |
| ३ | श्री तामगाडगे एस.टी., सहा. अधिक्षक | कला व मानव्य शास्त्र अभ्यासक्रम | ८३२९७७०७८५ |
| ४ | श्री कदम विजय, सहा. अधिक्षक | वाणिज्य अभ्यासक्रम | ८९७५३५७४४० |

**परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रक :**

| | |
|---|---|
| महाविद्यालय व विद्यापीठ सुरु होण्याची तारीख | जून १५, २०२० (तात्पुरत्या स्वरुपात) |
| शैक्षणिक उपक्रमांच्या पूर्वतयारीचा कालावधी | ३० जून २०२० पर्यंत |

| | |
|---|---|
| पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षा वगळून इतर परीक्षांच्या गुणपत्रिका विद्यापीठाला सादर करण्याची तारीख | ३० जून २०२० पर्यंत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतीम परीक्षा वगळून इतर सर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची तारीख | १५ जुलै, २०२० पर्यंत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतीम परीक्षा व त्यांच्या इतर अनुशेष परीक्षांच्या तारखा | ०१ जुलै ते ३१ जुलै, २०२० |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतीम परीक्षांचे तसेच त्यांच्या अनुशेष परीक्षांचे निकाल | १५ ऑगस्ट, २०२० पर्यंत |
| शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ :<br>अ) पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ग वगळून सर्व अभ्यासक्रमांचे वर्ग<br>ब) प्रथम वर्ष पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर | अ) ०१ ऑगस्ट, २०२० पासून<br>ब) ०१ सप्टेंबर, २०२० पासून |

वरील सर्व नमूद बाबी विद्यार्थ्यांना माहितीस्तव व त्यांच्या शंकांचे निरसन होणेसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. या सर्व बाबी सक्षम प्राधिकरणासमोर निर्णयासाठी ठेवण्यात येत असून प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. उपरोक्त बाबीमध्ये झालेले बदल वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(डॉ. रवि एन. सरोदे)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**

१. मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तूत विद्यापीठ.
२. मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
४. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
७. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की सदर बातमी विनामुल्य वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
८. उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, अधिक्षक/सहा. अधिक्षक, संगंणक कक्ष परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ